ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-III October 2012

# अध्ययनशील समाजाचा उदय आणि अध्यापक शिक्षण

प्रा.श्री. पी.बी. वाघेरे,
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक.

समाजात जस जसे शिक्षणाचे वारे शिरु लागले तस तसे समाजात समाज परिवर्तन होऊ लागले. आजच्या दृष्टीने समाजातील प्रत्येक घटकाचे शिक्षण होणे गरजेचे आहे. पूर्वीच्या काळी समाज हा स्थिर होता. जीवन प्रक्रिया ही संथगतीने होत होती. चालत आलेली पंरपरा व पारंपारिकतेनुसार समाज आपले जीवन व्यथीत करीत होता. परंतु औद्योगिक क्रांतीच्या युगाने मानवी जीवनात एकदम आमुलाग्र असे बदल घडवून आणलेले आहेत. समाजाच्या गरजा, आकांक्षा, प्रश्न हे बदलत गेल्याने वर्तमान व्यवस्था अपुरी पडली आहे. त्यातून तो असमाधानी होऊन नवीन विचारांची, संकल्पनाची निर्मिती होऊ लागली. समाजातील नवीन विचार प्रवाहाची चाहूल लागली. आधुनिक युगाचे **शिक्षण हेच एकमेव आशास्थान बनू लागले**. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रात ज्ञानाची नित्याने नवीन भर पडत आहे.

प्रगतीच्या या धडक्यामुळे समाजातील परंपरेनुसार चालणाऱ्या श्रध्दा, निष्ठा व भावना या सारख्या गोष्टींचा लोप होत आहे. या लोपामुळेच अध्ययनशील समाजाची निर्मिती होत आहे. आधुनिक गरजेपोटी अध्ययनकर्ता समाज ही संकल्पना उदयास आली आहे. उदा. कुटूंब संस्थेच्या माध्यमातून मिळणारे औपचारिक संस्थांच्या माध्यमातून शिक्षण देणे जास्त गरजेचे वाटू लागले आहे. समाजात नवनवीन विचार प्रवाहांचा ओघ, ज्ञानाचा प्रस्फोट, विज्ञान तंत्रज्ञानामुळे समाजात झालेली प्रगती, यामुळे समाजाचे चित्र हे बदलत गेले आहे. तुटपूंज्या ज्ञानावर अवलंबून न राहता अधिकाधिक ज्ञान घेणे, प्रगती करणे महत्तवाचे वाटू लागले. सतत अध्ययनशील राहणे म्हणजे अध्ययनकर्ता समाज निर्माण होणे गरजेचे आहे. हे आज आपल्या समोर संकल्पित चित्र आहे.

## अध्ययनार्थी समाज म्हणजे काय?

समाजातील प्रत्येक व्यक्ती आपल्या गरजेनुसार, कुवतीनुसार, प्राप्त परिस्थितीतून, स्वत:च्या गतीने कोणत्याही अध्ययन अध्यापन साधनांद्वारे कोणत्याही पद्धतीने शिकत असते. अध्ययन करीत असते अशा समाजाला **अध्ययनकर्ता समाज** असे म्हटले आहे.

**अध्ययनार्थी समाजाची गरज:**

सद्याच्या युगात ज्ञानाचा प्रचंड असा विस्फोट होत आहे. ज्ञान मिळविण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वार होत आहे. आपाणास प्रगत राष्ट्रांबरोबर जायचे असल्यामुळे अध्ययनार्थी समाजाला या संकलपनेच्या दिशेने वाटचाल ही करावीच लागेल. अशा वेळी सद्याच्या युगात समाजाच्या काय गरजा आहेत? हे जाणूनच समाजातील औपचारिक कार्यवाहिन्यांची मदत घ्यावी लागेल, कारण समाजाचे रुप हे दिवसोंदिवस बदलत आहे. मानवापुढे अनेक समस्यांचे प्रश्न व त्यांचे काहूर उभे आहेत. आधुनिक तंत्रज्ञानामुळे फार मोठे विश्व निर्माण होत आहे. सद्याच्या गतीमान जीवनाला सामोरे जाण्यासाठी समाजालाही गतीमान व्हावे लागत आहे. त्यासाठी शिक्षण फार म्हत्त्वाचे आहे. शिक्षणच मानवाला परिपूर्ण बनविते व त्याच्या सर्वांगिण विकास घडविण्याचे प्रभावी अस्त्रच बनते. अध्ययनशील समाज बनविण्यासच समाज हाच महत्तवाचा वाटा आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थी टिकाव धरुन ठेवण्याकरिता त्याला आधुनिक तंत्रज्ञानाचे शिक्षण देणे गरजेचे आहे. प्रत्येक क्षणाला नवनवीन तंत्रज्ञानाची क्षितीजे उदयास येत आहेत. कालचे शिक्षण कालबाह्य ठरत आहे. यादृष्टीने समाजाच्या बदलत्या गरजा व त्यांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी शिक्षण व्यवस्था ही तशीच परिपूर्ण व समर्थ असणे गरजेचे आहे. त्यामुळे शिक्षण पद्धतीने जीवनात सातत्याने आणि वेगाने बदलणाऱ्या परिस्थितीशी समायोजन साधण्यास समर्थ बनले पाहिजे. याकरिता शिकणारा समाज निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

**अध्यनार्थी समाजाचे महत्त्व:**

अध्ययनशील समाजासाठी अध्यापक शिक्षणाला अनेक बदल करावे लागतील, मानवाच्या गरजा व मागणी लक्षात घेवून विविध प्रकारचे अभ्यासक्रम, प्रवेश पद्धतीमध्ये लवचिकता, अध्यापन पद्धतीमध्ये सुधारणा, नवनवीन तंत्रविज्ञानचा व अध्यापन पद्धतीचा शोध, ज्ञान मिळविण्याच्या अप्रत्यक्ष पद्धतींचा अभ्यास, समाजातील बहुविध घटकांचा सहभाग या सारखे मूलभूत स्वरुपाचे बदल शैक्षणिक संस्थामध्ये होणे अपेक्षित आहे. युनेस्कोच्या आंतरराष्ट्रीय विकास आयोगाने म्हटले आहे की, **या विचाराच्या प्रकाशात पाहिले तर उद्याच्या शिक्षणाला अशी रचना करावी लागेल की समाजाचे सर्व विभाग गट बनलेले आहेत शिक्षण सार्वत्रिक होईल व संपूर्ण जीवनभर चालेल, व्यक्तिगत विचार न करता ते संपूर्ण निर्मितीक्षम असेल आणि म्हणूनच ते व्यक्तिच्या गरजेनुसार,**


**ताकदीनुसार दिले जाईल. संस्कृतीकडे आकर्षित करणारी शक्ती असेल, जीवनाची तटबंदी असेल व त्यामुळे त्याची व्यावसायिक उन्नती करणारे असेल. शिक्षणामधला हा बदल अपरिवर्तनीय व अप्रतिकारात्मक असा आहे.**

आयोगाचे वरील स्वप्न साकार करण्याचा असा जो समाज आहे तो म्हणजे शिकणारा समाज किंवा अध्ययन कर्ता समाज किंवा अध्ययनशील समाज होय. यातूनच सुसंस्कृत समाजाकडे वाटचाल करावयाची आहे. याकरिता अध्ययनशील समाजाची गरज निर्माण होऊ पाहत आहे.

**अध्ययनशील समाजातील नवीन प्रवाह:**

आजच्या अध्ययनशील समाजाला 21व्या शतकातील समाजाला आव्हाने पेलायची आहेत. त्याकरिता उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानाचा उपयोग करायला हवा समाजातील नवीन प्रवाह बरोबर आजया सपर्धेच्या युगात अध्ययनशील समाजाची निर्मिती होण्यासाठी नवीन प्रवाहांना तोंड देता आले पाहिजे.

**समाजातील नवीन प्रवाह:**




माहिती तंत्रज्ञानाने संपूर्ण समाजाला व्यापलेले आहे. त्यातून संप्रेषणाची निरनिराळी माध्यमे उदयास आलेली आहेत. या महानगरीस समाजाला ई-समाज असे म्हणता येईल. अध्ययनशील समाजाची वाटचाल ई-समाजाकडे होऊ लागलेली आहे. त्याचा उपयोग आपणास शिक्षणक्षेत्रात मोठ्या प्रमाणात होत आहे.

साध्या चित्रापासून सॅटेलाईट, अनुदेशन, दूरदर्शन प्रयोगापर्यंतचे प्रयोग आपण करीत आहोत. तंत्रज्ञानाच्या युगात ई-मेल, ई-क्लास मध्ये प्रवेश करीत असतांना ई-शिक्षक तयार करणे हे एक आव्हानच आहे.

**अध्ययनशील समाजात अध्यापक शिक्षणाची भूमिका:**

अध्ययनशील समाजात अध्यापक शिक्षणाने खालील बदल करणे अपेक्षित आहेत. तर खऱ्या अर्थाने ई-शिक्षक तयार होईल त्यातूनच ई-समाज व ई-विद्यार्थी तयार होईल. याकरिता खालील बदल होणे अपेक्षित आहे.

1. सद्याचे युग हे संगणकाचे असल्याने संगणकाचा जास्तीत जास्त वापर करण्याची संधी प्रशिक्षणार्थींना उपलब्ध करुन द्यावी.
2. अध्यापनात नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी शिक्षकांना प्रोत्साहन देणे. उदा. ओएचपी., एलसीडी, स्लाईड प्रोजेक्टर इ. साधने वापरण्याचे कौशल्य प्रशिक्षणार्थींमध्ये निर्माण करणे.
3. सर्व समावेशक शिक्षणासाठी वेगळ्या अभ्यासक्रमाची तरतूद करणे.
4. ऑनलाईन परीक्षा पद्धतीचे केंद्र सुरु करावे.
5. विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनासाठी स्वतंत्र रिडींग रुम उपलब्ध करुन देणे नंतर त्यावर चर्चासत्र घेणे.
6. महाविद्यालयाने कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांशी संधान ठेवणे.
7. माजी विद्यार्थी संघाचे जास्तीत जास्त कार्यक्रम घेवून त्या प्रशिक्षणार्थींना सहभागी करुन घेणे.
8. शिक्षक प्रशिक्षणाचा विद्यापीठातील शैक्षणिक विभागाने वेळोवेळी मूल्यमापन करणे आवश्यक आहे.
9. शालेय विषयासाठी संस्थेने किंवा महाविद्यालयाने शिक्षक प्रशिक्षकांसाठी इतिहास, भूगोल, गणित, विज्ञान, इंग्रजी, मराठी व हिंदी या विषयासाठी छोटे छोटे अभ्यासक्रम तयार करावेत. त्यामुळे आशयज्ञान हे पक्के होईल.

**समारोप :**

"राष्ट्राची गुणवत्ता ही नागरिकांच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. नागरिकांची गुणवत्ता ही त्याच्या शिक्षणावर अवलंबून असते आणि शिक्षणाची गुणवत्ता ही शिक्षकांच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. तेव्हा शिक्षकाच्या गुणवत्तेसाठी उद्बोधन वर्ग, चर्चासत्रे, परिषदा इ. विविध उपक्रम राबविले गेले पाहिजे. जेणे करुन शिक्षकाचा सर्वांगिण विकास होऊन समाजाचा जडण-घडणीचा त्याच्या महत्त्वाचा वाटा आहे.

त्यातूनच एक अध्ययनशील समाजाचा उदय होऊन अध्ययनशील समाज सर्वांगाने परिपूर्ण होईल ही अपेक्षा आहे."

**सदंर्भ सूची :**

1. **शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने,** प्रा.डॉ. ह.ना. जगताप, नूतन प्रकाशन, पुणे 1992
2. **शिक्षकांचे प्रशिक्षण,** डॉ.न.रा. पारसनीस
3. **उद्याचे शिक्षण,** एस.एस. कुलकर्णी